**<u>ठळक बातम्या</u>**

- इंडिया-AI इम्पॅक्ट समिट २०२६ला आजपासून नवी दिल्लीत प्रारंभ
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांची उद्या मुंबईत भेट
- २०२५-२६ च्या हंगामात फेब्रुवारीपर्यंत एकूण २ लाख १ हजार ५४७ टन साखर निर्यात
- प्रार्थनास्थळांवर महिलांबाबत भेदभाव होत असल्यासंदर्भात दाखल याचिकांची सुनावणी ९ न्यायाधीशांच्या पीठासमोर येत्या ७ एप्रिलपासून

**आणि**

- राजस्थानात भिवाडी इथं रसायनं आणि फटाके बनवणाऱ्या कारखान्यात आग लागून ८ कामगारांचा मृत्यू आणखी अनेकजण अडकल्याची शक्यता

**<><><><><>**

नवी दिल्ली इथं आजपासून इंडिया-AI इम्पॅक्ट समिट २०२६ सुरु होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवरची जागतिक परिषद प्रथमच विकसनशील देशात होत आहे. ही परिषद भारताला जागतिक ए-आय सहकार्य, सामायिक मानकं, सहयोगी चौकटी आणि सार्वजनिक हितासाठी मोजता येण्याजोगे उपाय, देण्यामध्ये संयोजक म्हणून स्थान देईल.

इंडिया ए-आय इम्पॅक्ट समिट २०२६, हे ३ सूत्रांवर आधारित असून, यात पीपल, प्लॅनेट, प्रोग्रेस, म्हणजेच मानव, पृथ्वी ग्रह आणि प्रगती, या जागतिक ए-आय सहकार्याला मार्गदर्शन करणाऱ्या तत्वांचा समावेश आहे.

या परिषदेत सहभागी होण्यासाठी शंभर पेक्षा जास्त देशांना आमंत्रित करण्यात आलं असून, दोन लाखांपेक्षा जास्त लोकांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे, तर २० पेक्षा जास्त देशांचे नेते आणि ४५ पेक्षा जास्त देशांची मंत्रीस्तरीय शिष्टमंडळं परिषदेत सहभागी होणार आहेत. परिषदेच्या पार्श्वभूमीवर आयोजित होत असलेल्या चर्चासत्रांमध्ये संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस आणि अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांचे अधिकारी सहभागी होतील.

**<><><><><>**

भारताकडे कृत्रिम बुद्धिमत्तेचं कौशल्य आत्मसात करण्याची सर्वोत्तम क्षमता असून, नवोन्मेषाला वाव देण्यासाठी भारताने अतिरेकी नियमन टाळण्याचं धोरण स्वीकारलं आहे, असं केंद्रीय मंत्री जितीन प्रसाद यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं ए-आय इम्पॅक्ट परिषदेतल्या चर्चासत्रात बोलत होते. जागतिक ए-आय क्षेत्रामध्ये योगदान देण्यासाठी भारताकडे वेग आणि व्याप्ती हे घटक असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मुंबईत येणार आहेत. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ आजपासून ३ दिवस भारत दौऱ्यावर येत असून दोन्ही नेत्यांची उद्या मुंबईत लोकभवन इथं भेट होणार आहे. उभय देशातल्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा ते यावेळी घेतील. त्यानंतर ते भारत फ्रान्स नवेन्मेष वर्ष २०२६ या कार्यक्रमाचं उद्घाटन संयुक्तपणे करतील. दोन्ही देशातले मोठे व्यावसायिक, उद्योगपती, संशोधक, आणि नवोन्मेषकर्मी या कार्यक्रमात भाग घेणार आहेत. मॅक्राँ यांची ही चौथी भारत भेट असून मुंबईला ते प्रथमच भेट देणार आहेत.

नवी दिल्लीत आयोजित एआय इम्पॅक्ट परिषदेचं आमंत्रण मोदी यांनी मॅक्राँ यांना दिलं आहे.

**<><><><><>**

२०२५-२६ च्या हंगामात फेब्रुवारी महिन्यापर्यंत भारताने एकूण २ लाख १ हजार ५४७ टन साखर निर्यात केली असून, यापैकी सर्वात जास्त निर्यात संयुक्त अरब अमिरातींमध्ये झाल्याचं अखिल भारतीय साखर व्यापार संघटनेनं जारी केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे. देशाची साखर निर्यात सरकारी नियंत्रणाखाली असून, साखर कारखाने त्यांना मंजूर झालेल्या प्रमाणात साखरेची निर्यात करतात. केंद्रसरकारने २०२५-२६ या विपणन हंगामासाठी एकूण २० लाख टन साखर निर्यातीला मान्यता दिली असून, यात नुकत्याच मंजूर झालेल्या अतिरिक्त ५ लाख टनांचा समावेश आहे. यंदाच्या हंगामात युएई खालोखाल, अफगाणिस्तान, जिबुती आणि भूतान या देशांना सर्वाधिक साखर निर्यात झाल्याचं यात म्हटलं आहे.

येत्या सप्टेंबरमध्ये संपत असलेल्या २०२५-२६ च्या विपणन हंगामात इथेनॉलसाठी होणारा वापर वगळता, भारताच्या साखर उत्पादनात १३ टक्के वाढ होईल, आणि ते २ कोटी ९६ लाख टन वर पोहोचेल असा अंदाज यात वर्तवला आहे.

**<><><><>**

कलम ३७० हटवल्यानंतर जम्मू काश्मीर, ईशान्येकडील राज्यं आणि नक्षलग्रस्त भागातल्या हिंसाचारात ८० टक्के घट झाल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. हे प्रदेश लवकरच हिंसामुक्त होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दिल्ली पोलीस दलाच्या ७९ व्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते आज नवी दिल्लीत बोलत होते. अकरा राज्यांमधे पसरलेली नक्षली चळवळ ही देशासाठी नेहमीच धोकादायक राहिली आहे, असं शहा म्हणाले.

- **- होल्ड बाईट शहा - -**

**<><><><>**

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आज ऑस्ट्रेलियाच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर रवाना होत आहेत. भारत-ऑस्ट्रेलिया संरक्षण सहकार्य अधिक मजबूत करणं आणि दोन्ही देशांमधले विकसित होत असलेले संबंध दृढ करणं, हे या भेटीचं उद्दिष्ट असल्याचं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

दोन्ही देशांमधली लष्करी गुंतवणूक वाढवण्यावर यावेळी भर दिला जाईल. यात प्रशिक्षण, संयुक्त कवायती, व्यावसायिक देवाण-घेवाण आणि क्षमता विकास याचा समावेश आहे.

**<><><><>**

प्रार्थनास्थळांवर महिलांबाबत भेदभाव होत असल्यासंदर्भात दाखल याचिकांची सुनावणी ९ न्यायाधीशांच्या पीठासमोर येत्या ७ एप्रिल पासून सुरु होईल, असं सर्वोच्च न्यायालयाने आज सांगितलं. केरळमधल्या शबरीमाला मंदिरात महिलांना प्रवेश देण्याच्या निर्णयाचा विरोध करणाऱ्या पुनर्विचार याचिकेचाही यात समावेश आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि विपुल एम. पांचोली यांच्या पीठाने हा निर्णय दिला. ही सुनावणी २२ एप्रिलला संपेल. सर्व याचिकाकर्त्यांना १४ मार्च किंवा त्याआधी निवेदन सादर करायला न्यायालयाने सांगितलं आहे. शबरीमाला प्रकरणी पुनर्विचार याचिकेवर ७ एप्रिल ते ९ एप्रिलला सुनावणी होईल, या याचिकेला विरोध करणाऱ्या याचिकांवर १४ ते १६ एप्रिलला सुनावणी होईल, त्यावर काही हरकती असतील तर २१ एप्रिलला सुनावणी होऊन २२ एप्रिलला अंतिम निर्णय दिला जाईल.

केरळमधल्या शबरीमाला मंदिरात महिलांना प्रवेश देण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांना केंद्र सरकारचा पाठिंबा असल्याचं सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी यावेळी न्यायालयाला सांगितलं.

**<><><><><>**

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर जानेवारी २०२६मधे १ पूर्णांक ८१ शतांश टक्के राहिला. अन्नपदार्थ, इतर वस्तू, आणि कारखान्यात तयार होणारी इतर उत्पादनं यांच्या दरात वाढ झाल्यानं हा परिणाम झाला आहे. डिसेंबर २०२५ मधे हा दर ८३ शतांश टक्के होता, तर गेल्या वर्षीच्या जानेवारी महिन्यात तो २ पूर्णांक ५१ शतांश टक्के होता. केंद्रीय उद्योग मंत्रालयाने ही माहिती दिली आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेसाठी सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी म्हणून तैनात असलेल्या सात अधिकाऱ्यांना केंद्रीय निवडणूक आयोगाने निलंबित केलं आहे. लोकप्रतिनिधी कायदा १९५०च्या कलम १३ सीसी अन्वये निवडणूक आयोगाने केलेलं हे निलंबन तात्काळ प्रभावाने लागू होईल. पुनरीक्षण सुरू असताना गंभीर गैरवर्तन करणं, कर्तव्यात कसूर करणं आणि वैधानिक अधिकारांचा गैरवापर करणं हे आरोप या सात जणांवर आहेत. या कार्यात तैनात असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या सात अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई सुरू करावी आणि आयोगाला या संदर्भात माहिती द्यावी, असे आदेश आयोगाने दिले आहेत.

**<><><><><>**

भारत आणि पोर्तुगीज सरकारमध्ये झालेल्या प्रत्यार्पण करारानुसार मुदतपूर्व सुटका मिळावी यासाठी कुख्यात दहशतवादी अबु सालेम याने दाखल केलेला अर्ज आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला. मुंबईत १९९३मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात सालेम याला टाडा कायद्यांतर्गत दोषी ठरवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज ग्रुप डी चा सामना युएई आणि अफगाणिस्तान यांच्यातला सामना नवी दिल्लीत सुरु झाला आहे. नाणेफेक जिंकून अफगाणिस्तानने प्रथम

क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. २० षटकात ९ बाद १६० धावा करुन युएईने अफगाणिस्तानसमोर विजयासाठी १६१ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

<><><><><>

राजस्थानात भिवाडी इथं रसायनं आणि फटाके बनवणाऱ्या कारखान्यात आग लागून ८ कामगारांचा मृत्यू झाला. इतर अनेक जण आत अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. आज सकाळी साडेनऊ च्या सुमारास या कारखान्यात स्फोट झाल्याने आगीचा भडका उडाला, असं अग्निशमन दल अधिकाऱ्यांनी सांगितलं. आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न अग्निसमन दल करीत असून मृतांची ओळख पटवण्याचं काम सुरु आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

हरयाणात अंबाला इथं एक ट्रक चालकाचं नियंत्रण सुटल्यानं ट्रक उलटला. त्याखाली दोन मोटारसायकली चिरडल्या गेल्या. या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला.

//<><><><><>//